RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १०३ (७)] शुक्रवार, ऑगस्ट २०, २०२१/श्रावण २९, शके १९४३ [पृष्ठे १४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २० ऑगस्ट २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.७९/२०२१/तांशि-४.-ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेली, शासकीय अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०२०/प्र.क्र.७१/तांशि-४, दिनांक ८ ऑक्टोबर २०२० (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) अन्वये, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार व्यावसायिक पाठ्यक्रम म्हणून व्यावसायिक शिक्षण पदवीपूर्व पाठ्यक्रम व व्यावसायिक शिक्षण पदव्युत्तर पाठ्यक्रम, आणि त्यांच्या प्रवेशाच्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता अधिसूचित केलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने, तिच्या मान्यता प्रक्रियेच्या हस्तपुस्तिका, २०२१-२०२२ मध्ये अभियांत्रिकी, नियोजन, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान या पदवीपूर्व पाठ्यक्रमांच्या व नियोजनामधील पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रमाच्या प्रवेशाच्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता यांमध्ये काही बदल (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त बदल" असा केला आहे) केले होते ;

आणि ज्याअर्थी, वास्तुशास्त्र परिषदेने, तिच्या अधिसूचना एफ. क्र. सीए/३७३/ २०२१/ एमएसएई (विनियम), दिनांक २३ मार्च, २०२१ अन्वये, वास्तुशास्त्र परिषद (वास्तुशास्त्र शिक्षणाची किमान मानके) विनियम,२०२० मध्ये सुधारणा केली आहे आणि तिच्या दिनांक २३ जुलै, २०२१ च्या स्पष्टीकरणानुसार वास्तुशास्त्र पदवी पाठ्यक्रमाच्या प्रवेशाच्या पात्रता निकषामध्ये सुधारणा (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त सुधारणा " असा केला आहे) केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त बदल व सुधारणा लक्षात घेता, उक्त व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवेशाच्या पात्रता शर्ती व आवश्यकता यांतील उक्त बदल व सुधारणा यांच्याशी अनुरूप बदल व सुधारणा करण्यासाठी तसेच व्यावसायिक शिक्षण

म्हणून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान (एकात्मिक) पाठ्यक्रमातील पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम अधिसूचित करणे आणि पाठ्यक्रमाच्या प्रवेशाच्या पात्रता शर्ती व आवश्यकता विनिर्दिष्ट करण्यासाठी उक्त अधिसूचनेत सुधारणा करणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) च्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) तसेच कलम २ च्या खंड (द) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, -

१. उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची - क मधील---

(१) स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान यांमधील पदवीपूर्व पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक १ येथील नोंदी ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :-

| | | |
|---|---|---|
| "१. | पदवीपूर्व अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पाठ्यक्रम (अभियांत्रिकी / तंत्रज्ञान स्नातक) (बी.ई. / बी.टेक.) | (१) **प्रथम वर्ष प्रवेश ,-**<br><br>***(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार,-***<br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने भौतिकशास्त्र व गणित या अनिवार्य विषयासह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कॉम्प्युटर सायन्स किंवा इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी किंवा इंफोर्म्याटीक प्रॅक्टिसेस किंवा कृषी किंवा इंजिनिअरिंग ग्राफिक्स किंवा बिजिनेस स्टडीज किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा उद्योजकता या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत; आणि त्याने सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेतील (सीईटी) सर्व विषयास बसलेला असावा व सीईटीमध्ये नॉनझिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे; **किंवा**<br>(दोन) उमेदवार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विषयातील ३ वर्षे कालावधीची पदविका उत्तीर्ण असला पाहिजे आणि त्याने किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत.<br>***(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार, जम्मू व काश्मीर केंद्र शासित प्रदेश व लडाख केंद्र शासित प्रदेश यांमधील स्थलांतरित उमेदवारी असलेला उमेदवार,-***<br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने, भौतिकशास्त्र व गणित या अनिवार्य विषयासह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कॉम्प्युटर सायन्स किंवा इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी किंवा इंफोर्म्याटीक प्रॅक्टिसेस किंवा कृषी किंवा इंजिनिअरिंग ग्राफिक्स किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | बिजिनेस स्टडीज किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा उद्योजकता या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत; आणि त्याने जेईई (मुख्य) बी.ई /बी.टेक मध्ये नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळवलेला असावा किंवा सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेतील (सीईटी) सर्व विषयास बसलेला असावा व सीईटीमध्ये नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे. तथापि, जेईई (मुख्य) बी.ई/बी.टेक मधील नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांस, सामाईक प्रवेश परीक्षेतील प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल; **किंवा**<br>(दोन) उमेदवार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विषयातील ३ वर्षे कालावधीची पदविका उत्तीर्ण असला पाहिजे आणि त्याने किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत.<br><br>*(३) अनिवासी भारतीय /भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती /भारतीय वंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक उमेदवारी असलेला उमेदवार,-*<br><br>(एक) उमेदवाराने, भौतिकशास्त्र आणि गणित या अनिवार्य विषयासह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कॉम्प्युटर सायन्स किंवा इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी किंवा इंफोर्म्याटीक प्रॅक्टिसेस किंवा कृषी किंवा इंजिनिअरिंग ग्राफिक्स किंवा बिजिनेस स्टडीज किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा उद्योजकता या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण मिळवलेले असावेत;<br>(दोन) अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले कोणतेही निकष.<br><br>*(ख) थेट द्वितीय वर्ष* (पार्श्विक प्रवेश) *प्रवेश,- महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार,-*<br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य |

| | | |
|---|---|---|
| | | शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान यामधील कोणत्याही शाखेतील किमान तीन वर्षांचा/ दोन वर्षांचा पाठ्यक्रम (पार्श्विक प्रवेश) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान यांमधील पदविका पाठ्यक्रम किंवा त्यास समतुल्य परीक्षा किमान ४५ टक्के गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, ४० टक्के गुण) उत्तीर्ण केलेला असावा; **किंवा**<br>(दोन) त्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या विद्यापीठातून बी.एससी. पदवी किमान ४५ टक्के गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, ४० टक्के गुण) उत्तीर्ण केलेली असावी आणि तो गणित हा विषय घेऊन एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेला असला पाहिजे; **किंवा**<br>(दोन) त्याने त्याच किंवा संलग्न क्षेत्रातील डी.व्होक. शाखेतील पदविका परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>(तीन) अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले इतर कोणतेही निकष.” |

(२) स्तंभ (२) समोरील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेल्या पदवीपूर्व वास्तुशास्त्र पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ३ येथील नोंदीमधील,-

(एक) खंड (१) मधील, उपखंड (तीन) मधील “किंवा जेईई (मुख्य) बी.आर्च मध्ये ” हा मजकूर वगळण्यात येईल;

(दोन) खंड (१) चे, परंतुक वगळण्यात येईल;

(तीन) खंड (२) मधील, उपखंड (दोन) मधील “किंवा जेईई (मुख्य) बी.आर्च मध्ये” हा मजकूर वगळण्यात येईल.

(चार) खंड (२) चे परंतुक वगळण्यात येईल;

(३) स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या पदवीपूर्व नियोजन पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ४ येथील नोंदीऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल, जसे,-

| | | |
|---|---|---|
| “४. | पदवीपूर्व नियोजन पाठ्यक्रम (नियोजन स्नातक) (बी.प्लानिंग.) | ***(१)महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार, -***<br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने, एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यात, त्याने एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत;<br>(तीन) उमेदवाराने, सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सामाईक प्रवेश परिक्षेमध्ये (सीईटी) नॉनझिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे. |

| | | |
|---|---|---|
| | | ***(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार आणि जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेश व लडाख केंद्रशासित प्रदेश यांमधील स्थलांतरित उमेदवारी असलेले उमेदवार,-*** <br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे; <br>(दोन) त्याने, एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यात त्याने एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत; <br>(तीन) उमेदवाराने जेईई (मुख्य) बी.प्लानिंग मध्ये नॉनझिरो पॉझिटव्ह प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे किंवा सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेत (सीईटी) नॉनझिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे. तथापि, जेईई (मुख्य) बी.प्लानिंग मधील नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांस, सामाईक प्रवेश परीक्षेतील नॉनझिरो प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल. <br>***(३) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती/ भारतीय वंशाच्या व्यक्ती, आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक उमेदवारी असलेले उमेदवार,-*** <br>(एक) त्याने, एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यात, त्याने एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण मिळवलेले असावेत; <br>(दोन) अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले इतर कोणतेही निकष.” |

(४) स्तंभ (३) मधील खंड (२) मध्ये नमूद केलेल्या पदवीपूर्व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ५ येथील नोंदीमधील **“(ख) थेट द्वितीय वर्ष (आनुषंगिक प्रवेश)”** हा मजकूर असलेल्या खंड (दोन) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल:-

“(दोन) त्याने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान यांमधील किमान तीन वर्षांचा /दोन वर्षांचा (आनुषंगिक प्रवेश) पदविका पाठ्यक्रम किंवा त्यास समतुल्य परीक्षा किमान ४५ टक्के गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत;”;

२. अनुसूची-ख मधील उप-शीर्षक “(**व्यावसायिक पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम**)” याखालील,-

(१) स्तंभ (२) मधील पदव्युत्तर पदवी नियोजन पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ८ येथील नोंदी मधील, स्तंभ (३) मध्ये दोन ठिकाणी आलेल्या “किंवा भूगोल" या शब्दांऐवजी दोन्ही ठिकाणी, “किंवा भूगोल अधिस्नातक पदवी” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) अनुक्रमांक ११ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल,-

| | | |
|---|---|---|
| "१२. | पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पाठ्यक्रम (एकात्मिक)<br><br>(अभियांत्रिकी अधिस्नातक) (एम.ई./एम.टेक.) (एकात्मिक) | *(१) महाराष्ट्रराज्य उमेदवारी असणारे उमेदवार,-*<br><br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन)त्याने, भौतिकशास्त्र आणि गणित या अनिवार्य विषयांसह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कॉम्प्युटर सायन्स किंवा इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी किंवा इंफोर्म्याटीक प्रॅक्टिसेस किंवा कृषी किंवा इंजिनिअरिंग ग्राफिक्स किंवा बिजिनेस स्टडीज किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा उद्योजकता या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत; आणि सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेतील (सीईटी) सर्व विषयास बसलेला असावा व नॉनझिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे; **किंवा**<br>(दोन) उमेदवार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विषयातील ३ वर्षे कालावधीची पदविका उत्तीर्ण असला पाहिजे आणि किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत.<br>*(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार, जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेश व लडाख केंद्रशासित प्रदेश यांमधील स्थलांतरित उमेदवारी असलेला उमेदवार,-*<br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने भौतिकशास्त्र आणि गणित या अनिवार्य विषयासह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कॉम्प्युटर सायन्स किंवा इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी किंवा इंफोर्म्याटीक प्रॅक्टिसेस किंवा कृषी किंवा इंजिनिअरिंग ग्राफिक्स किंवा बिजिनेस स्टडीज किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा उद्योजकता या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण ) मिळवलेले असावेत; आणि त्याने जेईई (मुख्य) बी.ई /बी.टेक मध्ये नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक किंवा सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेतील (सीईटी) सर्व विषयास बसलेला असावा व नॉनझिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे. तथापि, जेईई (मुख्य) बी.ई /बी.टेक मधील प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांस सामाईक प्रवेश परीक्षेतील प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल; **किंवा** |

| | | |
|---|---|---|
| | | (दोन) उमेदवार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विषयातील तीन वर्षे कालावधीची पदविका उत्तीर्ण असला पाहिजे आणि त्याने किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत.<br><br>***(३) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीयवंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक उमेदवारी असलेले उमेदवार,-***<br>(एक) उमेदवाराने, भौतिकशास्त्र आणि गणित या अनिवार्य विषयांसह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कॉम्प्युटर सायन्स किंवा इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी किंवा इंफोर्म्याटीक प्रॅक्टिसेस किंवा कृषी किंवा इंजिनिअरिंग ग्राफिक्स किंवा बिजिनेस स्टडीज किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा उद्योजकता या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्याससमतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण मिळवलेले असावेत;<br>(दोन) अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले इतर कोणतेही निकष.” |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय औ. धारुरकर,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 20th August, 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No. MIS. 2021/C.R.79/2021/TE-4.- Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No. TEM-2020/C.R.71/TE-4, dated the 8th October 2020 (hereinafter referred to as "the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (r) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), notified the Professional Education Under Graduate Courses and Professional Education Post Graduate Courses to be the Professional Education under the provisions of the said Act, and the eligibility conditions and requirements for admissions thereof ;

And whereas, All India Council for Technical Education in its approval process handbook 2021-2022 had made certain changes in eligibility conditions and requirements for admission in Undergraduate Courses in Engineering, Planning, Hotel Management and Catering Technology and Post Graduate Course in Planning (hereinafter referred to as "the said change");

And whereas, Council of Architecture has *vide* its Notification F. No.CA/373/2021/MSAE(Regulations), dated 23rd March 2021, amended the Council of Architecture (Minimum Standards of Architectural Education) Regulations, 2020 and *vide* it's clarification dated 23rd July 2021, made modification in eligibility criteria for admission to the Undergraduate Course of Architecture (hereinafter referred to as "the said modification");

And whereas, in view of said changes and modifications the Government of Maharashtra considers it expedient to amend the said notification so that to make it inconsonance with the said changes and modification in the eligibility conditions and requirements for admission of the said Professional Education and also to notify the Post Graduate Course in Engineering and Technology (Integrated) course as a Professional Education and specify thereof the eligibility conditions and requirements for admission of the said course;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (r) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015, the Government of Maharashtra hereby, amends the said notification, as follows:-

1. In Schedule - A appended to the said notification,-

(1) for entry at serial No. 1, relating to Undergraduate Course in Engineering and Technology mentioned in column (2), the following entry shall be substituted, namely:-

| | | |
|---|---|---|
| "1 | Undergraduate Course in Engineering and Technology (Bachelor of Engineering B.E./Bachelor of Technology B. Tech) | (A) First Year Admission. -<br>*(1) Maharashtra State Candidature Candidates. -*<br>(*i*) The Candidate should be an Indian National;<br>(*ii*) Passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subjects along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or Technical Vocational subject or Computer Science or Information Technology or Informatics Practices or Agriculture or |

| | | |
|---|---|---|
| | | Engineering Graphics or Business Studies or Electronics or Entrepreneurship and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State), in the above subjects taken together; and the Candidate should have appeared in all the subjects in CET and should obtain non zero score in CET conducted by the Competent Authority;<br>or<br>(*ii*)Passed minimum 3 years Diploma in Engineering and Technology and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category Candidates belonging to the Maharashtra State);<br>*(2) All India Candidature Candidates, Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh Migrant Candidature Candidates. -*<br>(*i*) The Candidate should be an Indian National;<br>(*ii*) Passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subjects along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or Technical Vocational subject or Computer Science or Information Technology or Informatics Practices or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Electronics or Entrepreneurship and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category Candidates belonging to Maharashtra State) in the above subjects taken together; and should obtain non zero positive score in JEE (Main) B.E./B.Tech or the Candidate should have appeared in all the subjects in CET and should obtain non zero score in CET conducted by the Competent Authority. However preference shall be given to the Candidate obtaining non zero positive score in JEE (Main) B.E./B.Tech over the Candidates who obtained non zero score in CET;<br>or |

| | | |
|---|---|---|
| | | (*ii*) Passed minimum 3 years Diploma in Engineering and Technology and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category Candidates belonging to the Maharashtra State );<br>*(3) NRI / OCI / PIO, Children of Indian workers in the Gulf countries and Foreign National Candidature Candidates. -*<br>(*i*) The Candidate should have passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subjects along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or Technical Vocational subject or Computer Science or Information Technology or Informatics Practices or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Electronics or Entrepreneurship and obtained at least 45% marks in the above subjects taken together;<br>(*ii*) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act.<br>(B) Direct Second Year (Lateral Entry) Admission, -*For Maharashtra State Candidature Candidates and All India Candidature Candidates, -*<br>(*i*) The Candidate should be an Indian National;<br>(*ii*) Passed minimum three years or two years (Lateral Entry) Diploma Course in Engineering and Technology with at least 45% marks (40% marks in case of Candidates of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to Maharashtra State) in any branch of Engineering and Technology from an All India Council for Technical Education or Central or State Government approved Institution or its equivalent;<br>or<br>(ii) Passed B.Sc. Degree from a University Grants Commission (UGC) or Association of Indian Universities recognized University with at least 45% marks (40% in case of candidates of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability |

| | | |
|---|---|---|
| | | category belonging to Maharashtra State) and passed HSC or its equivalent examination with Mathematics as a subject;<br>or<br>(ii) Passed D.Voc. Stream in the same or allied sector;<br>(iii) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act.”. |

(2) In entry at serial No. 3 relating to Undergraduate Course in Architecture mentioned in column (2), in column (*3*) ,-

(*i*) in clause *(1),* for sub-clause (iii), the words “or JEE (Main) B.Arch” shall be deleted;

*(ii)* proviso to clause (*1*) shall be deleted;

(*iii*) in clause *(2),* for sub-clause (ii), the words “or JEE (Main) B. Arch.” shall be deleted;-

*(iv)* proviso to clause (*2*) shall be deleted;

(3) For entry at serial No.4, relating to Undergraduate Course in Planning mention in coloum (2), the following entry shall be substituted, namely:-

| | | |
|---|---|---|
| “4. | Undergraduate Course in Planning (Bachelor of Planning B. Planning ) | *(1) Maharashtra State Candidature Candidates,-*<br>(i) The Candidate should be an Indian National;<br>(ii) Passed HSC or its equivalent examination and obtained at least 45% marks in aggregate (at least 40% marks in aggregate in case of Candidates of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to the Maharashtra State);<br>(iii) The Candidate should have obtained non zero score in the CET conducted by the Competent Authority.<br>*(2) All India Candidature Candidates and Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh Migrant Candidature Candidates. -*<br>(i) The Candidate should be an Indian National;<br>(ii) Passed HSC or its equivalent examination and obtained at least 45 % marks in aggregate (at least 40 % marks in aggregate in case of Candidates of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to the Maharashtra State);<br>(iii) The Candidate should have obtained non zero positive score in JEE (Main) B. Planning or the Candidate should have obtained non zero score in CET conducted by the Competent Authority. However, |

| | | |
|---|---|---|
| | | preference shall be given to the Candidate obtaining non zero positive score in JEE (Main) B. Planning over the Candidates who have obtained non zero score in CET.<br>*(3) NRI / OCI / PIO, Children of Indian workers in the Gulf countries and Foreign National Candidature Candidates.-*<br>(i) Passed HSC or its equivalent examination and obtained at least 45% marks in aggregate;<br>(ii) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act.”; |

(4) In entry at serial No. 5 relating to Undergraduate Course in Hotel Management and Catering Technology mentioned in column (2), in column (3), in caption “(B) Direct Second Year (Lateral Entry) Admission”, for clause (*ii*), the following clause shall be substituted, namely:-

“(*ii*) Passed minimum three years or two years (Lateral Entry) Diploma Course in Hotel Management and Catering Technology with at least 45% marks (40% marks in case of Candidates of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to Maharashtra State) from an All India Council for Technical Education or Central or State Government approved Institution or its equivalent;”;

2. In Schedule-B, under the sub-heading “(Professional Education Post Graduate Courses)”,

(1) In entry at serial No. 8, relating to Post Graduate Course in Planning, mentioned in column (2) in column (3), for the words “or Geography”, occurred at both the places, the words “or Master Degree of Geography” shall be substituted.

(2) After serial No.11, the following entry shall be added, namely,-

| | | |
|---|---|---|
| “12 | Post Graduate Course in Engineering and Technology (Integrated) (Master of Engineering M.E./Master of Technology M. Tech) (Integrated) | *(1) Maharashtra State Candidature Candidates. -*<br>(*i*) The Candidate should be an Indian National;<br>(*ii*) Passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subjects along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or Technical Vocational subject or Computer Science or Information Technology or Informatics Practices or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Electronics or Entrepreneurship and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category Candidates belonging to the Maharashtra State), in the above subjects taken together; and the Candidate should have appeared in all the subjects in CET and should obtain non zero score in CET conducted by the Competent Authority; |

| | | |
|---|---|---|
| | | or<br>(*ii*)Passed minimum 3 years Diploma in Engineering and Technology and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category Candidates belonging to the Maharashtra State);<br>*(2) All India Candidature Candidates, Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh Migrant Candidature Candidates. -*<br>(*i*) The Candidate should be an Indian National;<br>(*ii*) Passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subjects along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or Technical Vocational subject or Computer Science or Information Technology or Informatics Practices or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Electronics or Entrepreneurship and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State) in the above subjects taken together; and should obtain non zero positive score in JEE (Main) B.E./B.Tech or the Candidate should have appeared in all the subjects in CET and should obtain non zero score in CET conducted by the Competent Authority. However, preference shall be given to the Candidate obtaining non zero positive score in JEE (Main) B.E./B.Tech over the Candidates who obtained non zero score in CET;<br>or<br>(*ii*) Passed minimum 3 years Diploma in Engineering and Technology and obtained at least 45% marks (at least 40% marks, in case of Backward Class categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to the Maharashtra State );<br>*(3) NRI / OCI / PIO, Children of Indian workers in the Gulf countries and Foreign National Candidature Candidates. -*<br>(*i*) The Candidate should have passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subjects along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or |

| | | |
|---|---|---|
| | | Technical Vocational subject or Computer Science or Information Technology or Informatics Practices or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Electronics or Entrepreneurship and obtained at least 45% marks in the above subjects taken together;<br>(*ii*) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act.” |

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY A. DHARURKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.